दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक २६८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.२३ डिसेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# ५ वर्षापासून बेपत्ता असलेल्या मुलाला खांदेश्वर पोलिसांनी काढले शोधून




**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल येथून गेल्या ५ वर्षापासून किरकोळ वादातून घर सोडून गेलेल्या मुलाला खांदेश्वर पोलिसांनी अत्यंत कौशल्यपूर्ण तांत्रिक तपास करून मुंबई खार येथून शोधून काढल्याने खांदेश्वर पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक होत आहे.

कुशल कृष्णा ठाकूर (२३) हा मुलगा घरातील कौटुंबिक कलहामुळे घर सोडून गेला होता. याबाबतची तक्रार त्याच्या वडिलांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात दिली होती. त्याने घरातून निघून जाताना कोणताही पुरावा मागे सोडला नव्हता. त्यामुळे त्याचा ठाव ठिकाणा शोधून काढणे पोलिसांसमोर आवाहन होते. परंतु या आवाहनाचा स्वीकार वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुभाष कोकाटे यांनी केला व संबंधित मुलाचा शोध घेण्याची कामगिरी पो.नि.श्रीमती.वैभवी गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा.पो.निरीक्षक प्रवीण पांडे, पो.हवा. सुदर्शन सारंग, पो.शि.प्रवीण पाटील व पथकावर टाकली.

सदर मुलाच्या पॅनकार्डवरुन त्याच्या बँक अकाऊंटची माहिती प्राप्त करून घेण्यात आली. त्यावरुन अकाऊंट ओपनिंग फॉर्म प्राप्त करून त्याचा मोबाईल क्रमांक मिळविण्यात आला. सदर मोबाईल क्रमांकावर नमूद प्रकरणाचा तांत्रिक तपास सुरू केला असता सदर मुलगा हा वारंवार मोबाईल फोन बंद-चालू करीत होता.

तसेच राहण्याचे ठिकाणही सातत्याने बदलत होता. त्यामुळे त्याचा शोध घेणे दिवसेंदिवस कठीण होत होते. परंतु त्यातही कौशल्यपूर्ण तांत्रिक तपास सुरू ठेवून हा मुलगा खार परिसरात असल्याची माहिती त्यांना मिळाल्याने या पथकाने सदर ठिकाणी जावून त्याला ताब्यात घेवून त्याच्या आईवडिलांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. यावेळी आई वडिलांनी अत्यंत आनंद व्यक्त करून खांदेश्वर पोलिसांचे आभार मानले आहेत.

# माहिती व जनसंपर्क महासंचालक तथा सचिव पदी दिपक कपूर



**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुद्रित, इलेक्ट्रॉनिक माध्यमांबरोबरच विविध समाजमाध्यमे देखील महत्त्वाची आहेत. माहिती व जनसंपर्क अधिकाऱ्यांनी येत्या काळात समाजमाध्यमांचा अधिकाधिक वापर करुन शासनाच्या प्रतिमा निर्मितीचे काम करीत अचूकता आणि गतिमानतेवर भर द्यावा, असे आवाहन नवनियुक्त माहिती व जनसंपर्क महासंचालक तथा सचिव दीपक कपूर यांनी केले.

दीपक कपूर महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी आज माहिती व जनसंपर्क महासंचालक तथा सचिव पदाचा अतिरिक्त कार्यभार डॉ. दिलीप पांढरपट्टे यांच्याकडून स्वीकारला. यावेळी संचालक (प्रशासन) श्री. गणेश रामदासी यांनी पुष्पगुच्छ देऊन श्री. कपूर यांचे स्वागत केले तर डॉ. पांढरपट्टे यांना निरोप देण्यात आला. यावेळी प्रभारी संचालक (वृत्त-जनसंपर्क) दयानंद कांबळे, उपसंचालक (प्रशासन) गोविंद अहंकारी, उपसंचालक (प्रदर्शने) श्रीमती सीमा रनाळकर, उपसंचालक (प्रकाशने) अनिल आलुरकर यांचेसह विभागातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

पदभार स्वीकारल्यानंतर आयोजित बैठकीत श्री. दीपक कपूर म्हणाले की, समाजमाध्यमांमध्ये मोठी ताकद असून विविध जागतिक, राष्ट्रीय घडामोडींमध्ये याचा वापर कसा होतो ते दिसून आले आहे. शासनाच्या प्रसिद्धी व जनसंपर्काचे काम करीत असताना सर्व अधिकाऱ्यांनी समाजमाध्यमांचा सकारात्मक वापर करण्याची गरज आहे. समाजमाध्यमांवरील शासनविषयक किंवा आपल्या विभागाशी संबंधित पोस्ट्सवर तत्काळ प्रतिसाद दिल्यास शासनाच्या सकारात्मक प्रतिमानिर्मितीला त्याचा मोठा लाभ होणार आहे. लोकाभिमुख कल्याणकारी योजना, शासनाचे जनहिताचे निर्णय, घोषणा, उपक्रमांची माहिती तत्काळ लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी समाजमाध्यमांचा प्रभावी वापर करण्याचे आवाहन श्री. दीपक कपूर यांनी यावेळी केले.

शासनाच्या समाजमाध्यमांवरील मजकूर हा प्रसारमाध्यमांसाठी बातमीचा स्त्रोत व्हायला पाहिजे हे सांगताना अचूक, वस्तुनिष्ठ आणि अधिकृत माहिती देणे हा माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या बातम्यांचा मूळ गाभा आहे, त्यादृष्टीने कमी वेळेत अधिक गतीने माहितीचे प्रसारण करण्यासाठी अधिकाऱ्यांनी प्रयत्नशील राहण्याचे आवाहनही श्री. दीपक कपूर यांनी यावेळी केले.

यावेळी बोलताना मावळते सचिव तथा महासंचालक डॉ. दिलीप पांढरपट्टे यांनी दोन वर्षांच्या कालावधीतील कार्याचा आढावा घेतला. इतर सर्व विभागांपेक्षा माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या कामाचा अनुभव आपणासाठी वेगळा होता, असे सांगताना त्यांनी अहोरात्र सजग राहून काम करणाऱ्या या विभागाने कोरोना काळात केलेल्या कार्याचे त्यांनी कौतुक केले. डॉ. पांढरपट्टे यांची रोजगार हमी योजना व जलसंधारण विभागात मृद व जलसंधारण सचिवपदी नियुक्ती झाली आहे.

## संक्षिप्त...

### चंद्रकांत पाटलांना न्यायालयाचा दणका

**कोल्हापूर : वृत्तसंस्था**

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या चिथावणीमुळेच माजी खासदार किरीट सोमय्या यांनी ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांची बदनामी केली, त्यामुळे १०० कोटी रुपयांच्या अब्रुनुकसानीच्या दाव्यात पाटील यांचे नाव योग्यच आहे, असा आदेश सहावे सहदिवाणी न्यायालयाने दिला आहे. मुश्रीफ यांनी दाखल केलेल्या अब्रुनुकसानीच्या दाव्याशी आपला काहीही संबंध नसल्याचा पाटील यांचा युक्तीवाद न्यायायलाने फेटाळून लावला आहे.

राष्ट्रवादीचे नेते आणि ग्रामविकास मंत्री मुश्रीफ यांनी १५०० कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप किरीट सोमय्या यांनी केला होता. आरोप मागे घेऊन माफी न मागितल्यास १०० कोटी रुपयांचा अब्रुनुकसानीचा दावा दाखल करण्याचा इशारा मुश्रीफ यांनी दिला होता. मात्र सोमय्या यांनी माफी न मागितल्याने हसन मुश्रीफ यांनी कोल्हापुरातील न्यायालयात दावा दाखल केला. सोमय्या यांना भाजपचे प्रदेशाध्यक्ष पाटील यांनीच आरोप करण्यास फूस लावल्याचा आरोप करत त्यांनाही या खटल्यात पक्षकार करण्यात आले होते.

या प्रकरणाची बुधवारी न्यायालयात सुनावणी झाली. प्रदेशाध्यक्ष पाटील यांचा या खटल्याशी काहीही संबंध नाही, त्यांना विनाकारण पक्षकार करण्यात आलं आहे, त्यामुळे हा दावा रद्द करावा, अशी मागणी पाटील यांच्यावतीने ॲड. प्रल्हाद परांजपे यांनी केली. मात्र चंद्रकांत पाटील यांच्यामुळेच सोमय्या यांनी आरोप केल्याचा युक्तीवाद मुश्रीफ यांच्यावतीने ॲड. प्रशांत चिटणीस व ॲड. सतीश कुणकेकर यांनी केला.

दरम्यान, हसन मुश्रीफ यांच्या वतीने करण्यात आलेला युक्तिवाद सहावे सहदिवाणी न्यायाधीश पी. व्ही. राणे यांनी मान्य केला आणि चंद्रकांत पाटील यांचा दावा फेटाळून लावला आहे.

# पालीत संकष्टी चतुर्थीला बाप्पाच्या दर्शनाला उसळली गर्दी



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

राज्यातील सर्व मंदिरे दर्शनासाठी खुली करण्यात आलीत. त्यामुळे भाविक खुश आहेत. आता केव्हाही बाप्पाचं दर्शन घेण्याची मुभा मिळालीय. भाविकांचा मंदिरातील ओघ देखील वाढला आहे. अष्टविनायक तीर्थ क्षेत्रापैकी प्रख्यात धार्मिक स्थळ असलेले पालीतील बल्लाळेश्वर मंदिर बुधवार (दि: २२) रोजी संकष्टी चतुर्थीला बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी पालीत मोठ्या संख्येने भाविक दाखल झाले होते. सकाळपासूनच दर्शनासाठी मोठ्या रांगा लागल्या होत्या. पालीत चहूबाजुनी पर्यटक व भाविक आल्याने जणू भक्ती मळा फुलला होता. रांगेत उभे राहून भाविकांनी बल्लाळेश्वराचे मनोभावे पूजन करून दर्शन घेतले.

भाविकांचा उत्साह ओसंडून वाहत होता, बाप्पाच्या भेटीनंतर भक्तांच्या चेहऱ्यावरील समाधान दिसून येत होते. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या भक्तिभावाने येत असतात, अनेकजण तर अष्टविनायक दर्शनाचा बेत आखून ठिकठिकाणी पोहचून बाप्पाचे दर्शन भाविक रायगड जिल्हा, महाराष्ट्रातील विविध भागांसह मुंबई, ठाणे पुणे आदी शहरांतील भाविक व पर्यटक मोठ्या प्रमाणावर पालीत दाखल झाले होते. गर्दी असल्याने येथील दुकानदार व हॉटेल व्यवसायिकांचा धंदा देखिल तेजीत होता. बल्लाळेश्वर मंदिर परिसरात गावठी भाज्या, फळे, कंदमुळे व रानमेवा घेऊन अनेक महिला विक्रेत्या बसल्या होत्या. देवळात येणारे भाविक आवर्जून ते खरेदी करत होते. त्यामुळे या विक्रेत्यांचा धंदा चांगला झाला.

संकष्टी निमित्त मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले होते. परिसरातील हॉटेल, खेळण्याची व शोभिवंत वस्तुंची दुकाने, नारळ, हार, फुल व पापड मिरगुंड, कडधान्य विक्रेते, प्रसाद व पेढेवाले जय्यत तयारीत होते. आदिवासी महिला भगिनी रानभाज्या व कंदमुळं विक्रीस घेऊन बसल्या होत्या, भाविकांनी येथून चांगली खरेदी केली. त्यामुळे त्यांच्या रोजगाराची संधी देखील उपलब्द झाली. दरम्यान मंदिर परिसरात मोठी वर्दळ पहायला मिळत होती. जणूकाही यात्रेचे स्वरूप आले होते. भाविकांच्या सोईसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती.

# नवीन पनवेलमध्ये मनसेने केला कर्नाटक येथील घटनेचा तीव्र निषेध



**दै.रायगड नगरी । पनवेल**

कर्नाटक बंगळूर येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची विटंबना केल्याने सर्वत्र तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. या धर्तीवर नवीन पनवेल येथील महाराष्ट्र सैनिक देखील आक्रमक झाले. यावेळी मनसे वाहतूक सेनेचे पनवेल तालुका चिटणीस सुजित सोनावणे, नवीन पनवेल मनसे विद्यार्थी सेना अनिकेत मोहिते यांच्या नेतृत्वाखाली कर्नाटक येथील घटनेचा निषेध नोंदवण्यात आला. तसेच निषेधाचे फलकही झळकवण्यात आले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी आदर, प्रेम व्यक्त करताना महाराजांच्याया तळ्यास दुधाने अभिषेक घालण्यात आला.

याप्रसंगी मनसेचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष अतुल चव्हाण, नवीन पनवेल शहर अध्यक्ष पराग बालड, पनवेल शहर अध्यक्ष संजय मुरकुटे, पनवेल शहर वाहतूक चिटणीस सचिन जाधव, मनविसे उपशहर अध्यक्ष मंदार गोसावी, विभाग अध्यक्ष सौरभ पाटोळे,आदई विभाग उपाध्यक्ष राकेश वाघमारे, आदई विभाग महिला अध्यक्षा सपना सोडकर, शाखाध्यक्ष राज पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी व महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे केवळ प्रेरणास्थान नसून आम्हा सर्वांचे दैवतही आहे. आमच्या प्रेरणास्थानाची विटंबना ही अत्यंत निंदनीय गोष्ट आहे.

छ. शिवाजी महाराज हे संपूर्ण महाराष्ट्राची अस्मिता आहेत. आमची ओळख, आमची अस्मिता व प्रेरणास्थानाला गालबोट लावण्याचा जर कोणी प्रयत्न करत असेल तर हे कदापिही सहन करणार नाही असे मनसे वाहतूक सेनेचे पनवेल तालुका चिटणीस सुजित सोनावणे यांनी यावेळी सांगितले.

# बार कौन्सिल महाराष्ट्र आणि गोवाचे चेअरमन ॲड.गजानन चव्हाण आणि ॲड.संग्राम देसाई यांचा पनवेल वकील संघटनेने केला सत्कार




**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल वकिल संघटना आणि अधिवक्ता परिषद, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने बार कौन्सिल महाराष्ट्र आणि गोवाचे चेअरमन ॲड. गजानन चव्हाण आणि व्हाईस चेअरमन ॲड. संग्राम देसाई यांचा सत्कार पनवेल येथे करण्यात आला.

यावेळी उभयतांनी बार कॉन्सिलच्या माध्यमातून वकिलांकरिता सुरू असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाची प्रस्तावना पनवेल वकिल संघटना आणि अधिवक्ता परिषद, पनवेलचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ यांनी केली. पाहुण्यांची ओळख जेष्ठ ॲड. दिपक गायकवाड यांनी करून दिली आणि सूत्रसंचालन ॲड. सुनील तेलगे व आभार प्रदर्शन ॲड. संतोष पवार यांनी केले. याप्रसंगी पनवेल वकिल संघटना आणि अधिवक्ता परिषद, पनवेलचे पदाधिकारी यांच्यासह पनवेल-उरण येथील अनेक ज्येष्ठ व नवोदित विधिज्ञ उपस्थित होते.

# जबरी चोरीसह मंगळसूत्र खेचून पसार होणारा सराईत गुन्हेगार गजाआड



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पायी चालत जाणाऱ्या महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र, सोन्याची चेन, जबरी चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास खांदेश्वर पोलिसांनी जेरबंद केले असून त्याच्याकडून आतापर्यंत चार गुन्हे उघडकीस आले आहेत. सोन्याचे दागिने व मोटार मिळून जवळपास २ लाख ८ हजार ८८८ रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

गेल्या काही दिवसापासून खांदेश्वर परिसरात महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने खेचून पसार होण्याचे प्रमाण वाढले होते. या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी नवी मुंबईचे पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंह, पोलीस सह आयुक्त डॉ.जय जाधव, पोलीस उपायुक्त परिमंडळ २ पनवेल शिवराज पाटील व सहा.पोलीस आयुक्त भागवत सोनावणे यांनी केलेल्या वेळोवेळी सुचनेनुसार खांदेश्वर पोलीस ठाण्याचे वपोनि सुभाष कोकाटे, पो.नि.गुन्हे श्रीमती.वैशाली गलांडे यांच्या मार्गदर्शनानुसार पो.उपनिरीक्षक .../२

# कळंबोलीतील उद्यानात अंधाराचे साम्राज्य सुरक्षारक्षक गायब



**दै.रायगड नगरी । कळंबोली**

कळंबोली वसाहतीमधील सेक्टर ६ मध्ये असणाऱ्या उद्यानामध्ये नागरी सुविधांचा पुरता बोजवारा उडाला आहे. उद्यानामधील दिव्यांच्या खाली रात्री अंधार असतो. येथे सुरक्षा रक्षकच नसल्याने उद्यानात येणाऱ्यांची सुरक्षा रामभरोसे आहे. उद्यानात बेकायदेशीर फुटबॉल खेळत असलेल्या शौकिनांची दहशत फिरणाऱ्या नागरिकांना बसली आहे. रात्रीच्या वेळी दारुडे व गरदुल्याचे बस्तान या उद्याना मध्ये सतत असते. याबाबत येथील नागरिकांनी चिंता व्यक्त करून सिडको अथवा महापालिकेने चांगल्या सुविधा देण्याची मागणी केली आहे.

लाखो रुपये खर्च करून सुद्धा कळंबोली मधील रहिवाशांना स्वच्छ व सुस्थितीत सुंदर व हिरवीगार उद्याने मिळत नाहीत. वसाहतीमधील सेक्टर ६ मध्ये असणाऱ्या उद्यानावर सिडको व महापालिका लाखो रुपये खर्च करीत आहेत. तरीही येथील झाडे हिरवीगार दिसत नाहीत. पाण्याचा शिडकाव या झाडांवर केलेला दिसून येत नाही. सुरक्षा रक्षकच गायब .../२

# जोडकामाचे पावित्र्य

नागरिकांना वेगवेगळ्या कारणांसाठी सर्वाधिक ओळखपत्रे आणि प्रमाणपत्रे बाळगायला लावणारा देश म्हणून भारताकडे पाहिले जाते. स्थानिक स्वराज्य संस्था ते केंद्र सरकार शेतकऱ्यांपासून विद्यार्थ्यांपर्यंत आणि करदात्यांपासून मतदारांपर्यंत अशा सर्वांना निदान चाळीस विविध प्रकारची ओळखपत्रे व प्रमाणपत्रे देत असतात. ही सगळीच सगळ्यांना लागतात असे नाही; त्यामुळे प्रत्येक नागरिकाला त्याची सर्वंकष ओळख पटविणारे एकच ओळखपत्र दिल्यास कारभार सोपा होईल, या उद्देशाने 'आधार कार्डा'ची संकल्पना पुढे आली. आज भारतात १३० कोटी नागरिकांकडे आधार कार्डे आहेत. २०१९मध्ये लोकसभेची निवडणूक झाली, तेव्हा ९१ कोटी २० लाख नागरिकांची नावे मतदार यादीत होती. स्वाभाविकच त्यांच्याकडे मतदार ओळखपत्रेही असणार. हा मतदारांचा आकडा एव्हाना सुमारे दोन ते अडीच कोटींनी वाढलेला असू शकतो. हे सगळे मतदार आणि आधार कार्डधारक यांना परस्परांशी जोडून टाकण्यासाठीचे विधेयक लोकसभेने सोमवारी जवळपास चर्चेविना मंजूर केले आहे. या विधेयकाची बराच काळ चर्चा चालू होती आणि यामुळे मतदारयाद्या 'साफ व स्वच्छ' होतील, असे म्हटले जात आहे. केंद्रीय मंत्र्यांनीही या विधेयकाचे समर्थन करताना, या मुद्द्याकडे लक्ष वेधले आहे. मतदार याद्यांमध्ये केवळ बोगस मतदार असतात असे नाही, तर एकाच नागरिकाचे नाव अनेकदा दोन-दोन ठिकाणी नोंदले जाते. तो दोन्ही ठिकाणी मतदान करू शकत नसला, तरी या दुहेरी नोंदणीमुळे मतदारांच्या संख्येचे गणित चुकू शकते. खरे तर, पूर्वी मतदारांसाठी वेगळे ओळखपत्र नव्हते, तेव्हा स्वतंत्र ओळखपत्र आले, की बोगस मतदानाला आळा बसेल आणि मतदारयाद्या नेमक्या होतील, असे म्हटले जाई. काही प्रमाणात तसे झाले, तरी ते पूर्णांशाने आजही झालेले नाही, हे विसरता कामा नये. आधार कार्ड आणि मतदार ओळखपत्र यांची जोडणी नव्या कायद्याने शक्य असली, तरी ती सक्तीची नसेल. विरोधकांचा एकूण नूर पाहता, अशी जोडणी करू नका, ही मोहीमच त्यांनी आपल्या मतदारांसाठी हाती घेतल्यास आश्चर्य वाटायला नको. आधार आणि मतदार कार्ड जोडणीतील महत्त्वाचा मुद्दा गुप्ततेचा होता व त्यावर आधीही बरीच चर्चा झाली आहे. लोकसभेत विधेयक मंजूर झाल्यानंतरही काही खासदारांनी हा मुद्दा पुन्हा एकदा उपस्थित केला. आधार कार्डामुळे मिळणारा नागरिकांचा व्यक्तिगत तपशील आणि त्यामुळे मतदारांच्या यादीत होऊ शकणारे संभाव्य घोटाळे, यांकडेही काही खासदारांनी लक्ष वेधले आहे. केंद्रीय कायदेमंत्री किरण रिजिजू यांनी या विधेयकाच्या समर्थनार्थ जेमतेम दोन-तीन मिनिटे भाषण केले. केंद्र सरकारने इतके महत्त्वाचे विधेयक लोकसभेत गंभीर आणि प्रदीर्घ चर्चा न करता, इतक्या घाईने मंजूर करून घ्यावे, हे आश्चर्यकारक आहे. यातून, लोकसभेत विधेयक किंवा कायद्याचा मसुदा मंजूर होणे, ही केवळ औपचारिकता असते, असा समज होण्याची शक्यता आहे. प्रत्यक्षात तसे नसते. कायदेमंडळात सर्व बाजूंनी, सखोल विचारविनिमय होऊन नंतर कायद्याच्या मसुद्याला सुडौल, अंतिम रूप यावे, अशी अपेक्षा आहे. प्रत्यक्षात सरकारने सभागृहात मांडलेले प्रारूप एकदाचे मंजूर करून टाकले, की संपले संसदेचे काम, असे हल्ली वारंवार होते आहे. ते खचितच योग्य नाही. मुळात आधार कार्ड हा नागरिकत्वाचा पुरावा नाही, हे मागेच स्पष्ट झाले आहे. सरकारनेही ते मान्य केले होते. दुसरीकडे, मतदार हा मात्र नागरिक असावाच लागतो. यामुळेच, आधार कार्डे देण्याची देशव्यापी मोहीम चालू असतानाच, केंद्रीय गृह खात्याने भारतीय नागरिकांची स्वतंत्र नोंदवही करण्याचे आणि ती राखण्याचे काम आपण सोडू शकत नाही, असे तेव्हा स्पष्ट केले होते. तेव्हा आधार व मतदार कार्डे जोडली गेल्यानंतर, मतदार याद्यांमधील नावे- अगदी सबळ कारणे देऊनही- गाळली जाऊ लागली, तर त्या 'कारवाईची घटनात्मक वैधता' हा प्रश्न उद्या उपस्थित होईल. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने विरोधकांशी सभागृहात सविस्तर चर्चा करणे टाळायला नको होते. काही काळापूर्वी आधार नोंदणीची पाहणी स्वतंत्र संस्थांनी केली होती, तेव्हा मतदार यादीइतक्याच; किंबहुना अधिकच गफलती आधार कार्ड देताना झाल्याचे आढळले होते. या गफलती दूर न होता, दोन्ही ओळखपत्रे परस्परांशी जोडणे कितपत उपयुक्त ठरेल? आधुनिक तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करून नागरिकांचे जीवन सोपे व सुकर करायलाच हवे. नागरिकांना खरे तर कमीत कमी ओळखपत्रे वापरून सर्व आर्थिक, सरकारी आणि खासगी व्यवहारही करता आले पाहिजेत. हे करताना एका बाजूला यंत्रणेतील पारदर्शकता आणि दुसरीकडे, नागरिकांच्या माहितीची गुप्तता, अशा वरवर परस्परविरोधी वाटणाऱ्या; पण परस्परानुकूल तत्त्वांशी तडजोड होता कामा नये. याचे कारण, या साऱ्याशी भारतीय लोकशाहीचे पावित्र्य आणि गांभीर्य जोडलेले आहे.

# पनवेल महापालिकेच्या पाचव्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित छायाचित्र स्पर्धेतील विजेत्यांचा महासभेत सन्मान

**दै.रायगड नगरी । पनवेल**



महानगरपालिकेच्या पाचव्या वर्धापनदिनानिमित्त 'रंग पनवेलचे' या संकल्पने अंतर्गत मुंबईचे महाद्वार पनवेल, बदलतं पनेवल माझं पनवेल, मायानगरीचे महाद्वार आमचं पनेवल या विषयांवर हौशी, व्यवसायिक व पालिका कर्मचारी छायाचित्रकारांसाठी महापालिकेने छायाचित्रण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. पन-वेल महापालिका कार्यक्षेत्रातील हौशी व व्यवसायिक छायाचित्रकारांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल आणि आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडून करण्यात आले होते. या स्पर्धेला पालिका क्षेत्रातील छायाचित्रकार स्पर्धकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या स्पर्धेतील विजेत्यांना नुकत्याच झालेल्या महासभेत पारितोषिकांचे वितरण करून सन्मान करण्यात आला.

या स्पर्धेतील व्यवसायिक गटामधील विजेते भालचंद्र जुमलेदार, लक्ष्मण ठाकूर, अनिकेत गावडे, हौशी गटामधील विजेते साहील रेळेकर, रूपाली देवकर, तेजेस चांडक आणि कर्मचारी गटातील विजेते डॉ. तेजेस पाटील, स्वप्नाली चौधरी, सौरभ पाटील यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि रोख रुपये पाच हजार रुपयांचे पारितोषिक महापौर डॉ.कविता चौतमोल, सभागृहनेते परेश ठाकूर, विरोधीपक्षनेते प्रितम म्हात्रे, आयुक्त गणेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, स्थायी समिती सदस्य, महिला बालकल्याण समिती सदस्य, नगरसेवक, नगरसेविका, पालिकेचे अधिकारी यांच्यासह आदी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

# पोलिस पाटील संघटनेच्या कोकण विभागीय अध्यक्षपदी संजय पाटील

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील पोलिस पाटील संजय गजानन पाटील यांची नुकतीच महाराष्ट्र गाव कामगार पोलिस पाटील संघटनेच्या कोकण विभागीय अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे.पनवेल येथे नुकत्याच पार पडलेल्या रायगड जिल्हा पोलीस पाटील संघटनेच्या मेळाव्यात संजय पाटील यांना पोलीस पाटील संघटनेच्या अध्यक्ष पदाचे नियुक्ती पत्र देण्यात आले.

संजय पाटील हे सध्या चिरनेर या उरण तालुक्यातील ऐतिहासिक गावाचे पोलिस पाटील म्हणून कार्यरत आहेत.संजय पाटील यांच्या नियुक्तीमुळे ग्रामीण भागातील पोलीस पाटील वर्गात आनंद व्यक्त करण्यात येत आहे.कोकण प्रांतातील पोलीस पाटीलांचे प्रश्न शासन दरबारी मांडून त्यांना न्याय देण्याचा नक्की प्रयत्न करणार असल्याची ग्वाही संजय पाटील यांनी नियुक्ती नंतर बोलताना दिली.

# नवीन पुनर्वसन धोरण लवकरच आणणार : ना.विजय वडेट्टीवार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्याचे पुनर्वसन धोरण तयार करण्याचे काम सुरू असून लवकरच नवीन पुनर्वसन धोरण आणण्यात येईल. या धोरणामध्ये नवे निकष आणि नियमातील सुधारणा यांचा समावेश असेल. एखाद्या जिल्ह्यात आ-पत्ती ओढविल्यानंतर शासनामार्फत देण्यात येणारी मदत वितरीत करण्याचे अधिकार नवीन पुनर्वसन धोरणानुसार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येणार असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली.

विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्यासह सदस्य सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, चंद्रकांत पाटील आदींनी या संदर्भातील लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. सदस्य सर्वश्री शेखर निकम, योगेश कदम, राजेश पवार, संग्राम थोपटे, प्रकाश सोळंके, भास्कर जाधव, किशोर पाटील आदींनी यावेळी चर्चेत सहभाग घेतला.

मदत व पुनर्वसन मंत्री श्री.वडेट्टीवार म्हणा-ले, जुलै, २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यात उद्भवलेल्या पूरपरिस्थितीत जीवित व आर्थिक नुकसान झाले. या कालावधीत झालेल्या नुकसानीकरिता राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दरापेक्षा वाढीव दराने मदत देण्याकरिता कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. महाड व चिपळूण शहरामध्ये अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात पुराचे पाणी आल्यामुळे आर्थिक नुकसान झाले आहे. या अतिवृष्टीमुळे झालेल्या जीवित व आर्थिक नुकसानीकरिता राज्य आपत्ती प्रतिसाद निधी व राज्य शासनाच्या निधीमधून एकूण पाचशे चौपन्न कोटी ८७ लाख ५३ हजार रुपये इतका निधी संबंधित विभागीय आयुक्तांमार्फत जिल्ह्यांना वितरीत करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे दुकानदार व टपरीधारक यांना मदत अनुज्ञेय करण्यात आली आहे.

जुलै, २०२१ मधील अतिवृष्टी व पूरामुळे बाधित झालेल्या राज्यातील २२ जिल्ह्यांमधील जिरायत, आश्वासीत, बहुवार्षिक शेतीपिकांच्या नुकसानीपोटी तूर्त राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दराने रु.३६५६७.०० लाख इतका निधी वितरीत करण्यात आला असल्याचेही श्री.वडेट्टीवार यांनी सांगितले. महाड तालुक्यातील तळई गावामध्ये दरड कोसळल्यामुळे मृत झालेल्यांच्या वारसदारांना उणे प्राधिकारात जिल्हाधिकारी, रायगड यांनी निधी वितरीत केला असून भूस्खलनामध्ये मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेलेले व शोध न लागलेल्या नागरिकांबद्दल स्थानिक पातळीवर योग्य ती चौकशी करून दुर्घटनेवेळी या व्यक्ती त्या गावामध्ये असल्याच्या शक्यतेची खात्री करून त्यांच्या वारसदारांना सानुग्रह अनुदान देण्यास शासनामार्फत मंजूरी देण्यात आली आहे.

श्री. वडेट्टीवार म्हणाले, मदत, पुनर्बांधणी व आपत्ती सौम्यीकरण यावर खर्च करण्यास, तसेच जुलै, २०२१ च्या अतिवृष्टी व पुरामुळे बाधित आपत्तीग्रस्त नागरिकांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दरापेक्षा वाढीव दराने मदत देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. निधीपैकी मदतीसाठी रू.१५०० कोटी, पुनर्बांधणीसाठी रू. ३००० कोटी व बाधित क्षेत्रात सौम्यीकरण उपायोजनांसाठी रु.७००० कोटी अशा एकूण रु.११,५०० कोटी इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. बाधित क्षेत्रात सौम्यीकरण उपाययोजनांसाठी आपत्ती व्यवस्थापन प्रभागाकडून कार्यवाही सुरू असून कोकण विभागातील पाच जिल्ह्यांमध्ये नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करून आपत्ती सौम्यीकरण करण्यात येणार आहे. कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्प राबविण्यासाठी अंदाजित रु. ३२०० कोटी पर्यंत होणाऱ्या खर्चास मंत्रिमंडळाने तत्वतः मान्यता दिली असून त्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असल्याचेही श्री.वडेट्टीवार यांनी लेखी उत्तरात म्हटले आहे.

जून ते ऑक्टोबर, २०२१ पर्यंत राज्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीपोटी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दरापेक्षा वाढीव दराने शेतकऱ्यांना मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला. यानुसार ऑगस्ट ते सप्टेंबर, २०२१ मध्ये अतिवृष्टीमुळे राज्यातील २३ जिल्ह्यांमध्ये जिरायत, आश्वासित व बहुवार्षिक एकूण ४८,१३,७७१ हेक्टर बाधित झालेल्या अनुज्ञेय क्षेत्राकरिता राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दरानुसार व राज्य निधीच्या दरानुसार अनुज्ञेय असलेल्या निधीपैकी तुर्तास ७५ टक्के याप्रमाणे असून एकूण रु.३७६०९५.२४ लाख एवढा निधी वितरीत करण्यात आला असल्याची माहिती श्री.वडेट्टीवार यांनी लेखी उत्तरात दिली आहे. जुलै ते सप्टेंबर, २०२१ या कालावधीत शेतीपिकांच्या झालेल्या नुकसानीकरिता उपलब्ध करून द्यावयाचा उर्वरित मदतीसाठी व आवश्यक निधीची तरतूद चालू हिवाळी अधिवेशनामध्ये पूरक मागणीद्वारे करण्यात येत आहे.

तसेच ऑगस्ट ते सप्टेंबर, २०२१ मध्ये अतिवृष्टीमुळे मृत व्यक्तींच्या वारसदारांना उणे प्राधिकारात संबंधित जिल्हाधिकारी यांच्यामार्फत निधी वितरीत करण्यात आला आहे. माहे जून ते ऑक्टोबर, २०२० मध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीकरिता एकूण रूपये ४४८९९५.४२ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला असून त्यानुसार बाधितांना मदतीचे वाटप करण्यात आले आहे. विभागीय आयुक्तांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या लाभार्थ्यांची यादी व मदतीचा तपशील जिल्ह्यांच्या संकतेस्थळावर प्रसिद्ध करण्याची कार्यवाही सुरू असल्याची माहितीही श्री.वडेट्टीवार यांनी लेखी उत्तरात दिली आहे.

# लायन्स क्लब नागोठणे तर्फे मोफत डोळे तपासणी शिबीर

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठणे येथील दानशूर व्यक्तिमत्व लायन प्रकाश जैन यांच्या सौजन्याने त्यांचे वडील स्व. सरेमल प्रतापमला जैन यांच्या स्मरणार्थ रविवार दि.१९ डिसेंबर रोजी लायन्स क्लब नागोठणे तर्फे मोफत डोळे तपासणी शिबीर व अल्पदरात मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन नागोठण्यातील लायन्स व्हिजन येथे करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये नागोठणे व पंचक्रोशीतील ७० रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली . यामधे १८ मोतिबिंदू रुग्ण आढळले . त्या सर्व रुग्णांची नेत्र शस्त्रक्रिया लायन्स हेल्थ फाऊंडेशन चोंढी (अलिबाग) येथे करण्यात येणार असून मोतीबिंदू रुग्णांना आवश्यक असलेल्या सर्व प्रकारच्या टेस्ट लायन डॉ.अनिल गिते हे अल्पदरात करून देणार असल्याची माहिती एमजेएफ लायन विवेक सुभेकर यांनी दिली.

या शिबिराप्रसंगी लायन्स क्लब नागोठणेचे प्रेसिडेंट लायन सुजित महागावकर, चार्टड प्रेसिडेंट लायन प्रकाश जैन, लायन्स हेल्थ फाऊंडेशनचे सिईओ डॉ. मोहन हिंदूपूरसर, डिस्ट्रीक्ट चेअरमन एमजेएफ लायन यशवंत चित्रे, सेक्रेटरी एमजेएफ लायन विवेक सुभेकर, ट्रेझरर लायन संतोष शहासने, डायरेक्टर लायन दौलत मोदी, लायन विवेक करडे, लायन श्वेता सुभेकर, लायन सिध्देश काळे आदींसह लायन्स हेल्थ फाऊंडेशनची डॉक्टर टिम, द्रिष्टी ऑप्टीक्सचे ऑप्टीशिअन व नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

या शिबिराचे उदघाटन लायन्स हेल्थ फाऊंडेशनचे सिईओ डॉ. मोहन हिंदूपुर यांचे हस्ते करण्यात आले तसेच यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व मार्गदर्शन एमजेएफ लायन विवेक सुभेकर यांनी केले. शिबीर यशस्वी करण्यासाठी सर्व लायन्स सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.

# खा. श्रीरंग बारणे यांनी घेतली केंद्रीय मंत्री सोनोवाल यांची भेट

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण येथील नवीन शेवा व हनुमान कोळीवाडा गावाच्या पुनर्वसना बाबत केंद्रीय जल परिवहन मंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्या समवेत खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या उपस्थितीत परिवहन भवन, दिल्ली येथे बैठक झाली.

१९ जुलै २०१८ रोजी बैठक घेऊन गछ्झढ ने केंद्र सरकारला प्रस्ताव पाठवला आहे त्यास मंजुरी द्यावी तसेच गावांचा एकत्रीत विकास करावा तसेच नवीन शेवा गावच्या ३६१ तसेच हनुमान कोळीवाडा गावच्या २५६ घरांचे पुर्नवसन करावे, वाढीव विकसित भूखंड ठरल्या प्रमाणे देण्यात यावीत अशी मागणी केली.

सदर बाबत गावांचे पुनर्वसन करताना सर्व नागरी सुविधा विकसित करून द्याव्यात, सर्वोत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्यावी, घरांसाठी देण्यात येणाऱ्या प्लॉटना स्ट्रीट रोड, स्ट्रीट लाइट व प्लॉट समोर मोकळी जमीन असावी, तसेच समाजमंदिर, देवालय व गावांचे पारंपरिक सण व उत्सव साजरे करण्यासाठी आवश्यक तेवढी जमीन देण्यात यावी अशी मागणी खासदार श्रीरंग अप्पा बारणे यांनी केंद्रीय मंत्री महोदयांकडे केली आहे. या बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व सध्य परिस्थितीची मंत्री महोदयांना महिति देण्यात आली, या बाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल असे मंत्री महोदयांनी सुचित केले. खासदार व त्यांच्या शिष्ट मंडळाने घेतलेल्या भेटी मुळे पुनर्वसन व दोन्ही गावांच्या विकासाचा मार्ग मोकळा होत आहे. यावेळी कामगार नेते महेंद्र सावंत, करंजा मच्छिमार सहकारी सोसायटी संचालक हेमंत गौरीकर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## जबरी चोरीसह मंगळसूत्र खेचून पसार होणारा सराईत गुन्हेगार गजाआड

निलेश पोळ, पो.हवा.सारंग, पो.ना.घोसाळकर, पो.शि.युवराज शिवगुडे, पो.शि.संभाजी गाढे, पो.शि.सचिन सरगर आदींच्या पथकाने सदर गुन्हेगारांचा अधिक शोध घेत असताना त्यांना आरोपी धिरज पाटील (२१ रा.अंबिवली) याची माहिती मिळाली. त्यानुसार सदर पथकाने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले असता त्याने आतापर्यंत ४ गुन्ह्यांची कबुली दिली आहे. तसेच या गुन्ह्यासाठी त्यांनी वापरलेली मोटार सायकल सुद्धा पोलिसांनी हस्तगत केली आहे. त्याच्या अटकेमुळे पनवेल परिसरातील चेन चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता परिमंडळ २ चे पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांनी व्यक्त केली आहे.

## कळंबोलीतील उद्यानात अंधाराचे साम्राज्य सुरक्षारक्षक गायब

असल्याने या उद्यानामध्ये फुटबॉल शौकीन खेळणारे मोठ्या प्रमाणावर सायंकाळच्या वेळी खेळताना दिसून येतात त्यामुळे एकतर धुळीचा लोट उद्यानांमध्ये उडत असतो. येथे फेरफटका मारायला येणाऱ्या नागरिकांना फुटबॉल खेळणाऱ्या कडून प्रसाद मिळण्याची दहशत येथील नागरिकांना बसली आहे . उद्यानात फक्त एकच हाय मास्ट दिवे सुरू असल्याने आजूबाजूचे सर्व दिवे बंद अवस्थेत आहेत. त्यामुळे या उद्यानात रात्रीच्या वेळी दारुडे, गर्दुले यांचे कायम बस्तान बसलेले असते .मात्र उद्यानाची देखभाल करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांचे या गंभीर समस्येकडे पूर्ण कानाडोळा होत असल्याचे दिसून येत आहे. शासनाच्या कररूपाने मिळणाऱ्या पैशातून ऊद्यानावर जर लाखो रुपये खर्च होत असतील तर येथील नागरिकांना उद्यानात चांगल्या सुविधा का मिळत नाही असा संतापजनक सवाल येथील नागरिक महापालिका प्रशासनाला विचारत आहेत.याबाबत सिडको से कळंबोली येथील उद्यान अधिकारी गाडे यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की मी उद्याच उद्यानाला भेट देऊन याबाबतची पाहणी करून योग्य ती कारवाई करतो.


महाराष्ट्र शासन

## निविदा सुचना क्र.२० सन २०२१-२०२२

### सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग

खालील कामाच्या बी-१ निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,अलिबाग दुरध्वनी क्रमांक २२२०८४ हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून नोंदणीकृत (पंजीकृत) कंत्राटदारांकडून मागवित आहेत. कोऱ्या निविदा नमुना कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग,अलिबाग यांच्या संकेत स्थळावर दिनांक २४.१२.२०२१ ते दि. ३१.१२.२०२१ पर्यंत १०:०० ते १८:०० वाजेपर्यंत ऑनलाईन (www.mahapwd.com) वर उपलब्ध आहे. कार्यकारी अभियंता हे ठेकेदाराने भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा ऑफलाईन पद्धतीने दिनांक ०३.०१.२०२२ रोजी दुपारी १५.०० वाजेपर्यंत स्विकारतील आणि दि ०३.०१.२०२२ रोजी दुपारी १५.०१ वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसाऱ्याची रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी महिने | निविदेच्या नमुन्याचा प्रकार कोऱ्या निविदा नमुन्याची किंमत (रुपये) | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | पिंपळभाट अलिबाग येथील कर्मचारी निवासस्थाने इमारत तोडणे (इमारत क्र.१) ता. अलिबाग जि. रायगड | रु. १,६२,२६९/- | २०००/- | ०१ महिने | ब-१ रु.२२४/- | वर्ग ९ व वरील |
| २) | पिंपळभाट अलिबाग येथील कर्मचारी निवासस्थाने इमारत तोडणे (इमारत क्र.२) ता. अलिबाग जि. रायगड | रु. १,८७,६९९/- | २०००/- | ०१ महिने | ब-१ रु.२२४/- | वर्ग ९ व वरील |

टीप : १) तपशिलवार निविदा सुचना कार्यकारी अभियंता व अधीक्षक अभियंता यांचे कार्यालयीन फलकावर पहावयास मिळेल. तसेच कार्यकारी अभियंता यांना विनंती केल्यास निविदा सुचनेची प्रत विनामूल्य मिळू शकेल.
२) कोरी निविदा संच विक्री https//www.mahapwd.com या संकेत स्थळावर ऑनलाई उपलब्ध आहे.
३) इतर अटी व शर्ती निविदा नमुन्या मध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची बी-१-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.
४) सर्व पात्र / इच्छुक निविदा कारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या https//www.mahapwd.com या Portal वर enrolled करणे आवश्यक आहे.

(ज.ई. सुखदेवे)
कार्यकारी अभियंता
अलिबाग (सा.बां.) विभाग,
अलिबाग

जा.क्र. : अवि/लेशा/निविदा/ ६५८६ /२०२१
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
अलिबाग सा.बां. विभाग, अलिबाग
दिनांक :- २२.१२.२०२१

जिमाका/राअ/जाहिरात/१८८/२०२१-२२


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## वाहतूक शाखेचे हवालदार महेश पोतदार यांचे होत आहे कौतुक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कर्तव्य बजावित असलेले वाहतूक शाखेचे हवालदार महेश पोतदार यांना मिळालेले रस्त्यात पकलेले पैशाने भरलेले पाकिट व इतर कागदपत्र सदर संबंधित व्यक्तीशी संपर्क साधून त्यांना प्रामाणिकपणे परत केल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

अनिल फडके हे बेलापुर ते नेरे पनवेल बाईकवरून घरी परत येत असताना कळंबोली सर्केल येथे त्यांचे पॉकेट खिशातून पडले आणि ते पॉकेट वाहतूक पोलीस खात्यात कार्यरत असलेले हवालदार महेश पोतदार यांना सापडले, त्यात साडे आठ हजारांची रोकड, एटीएम कार्ड, आधारकार्ड व इतर कागदपत्रे होती. यावरून त्यांनी त्यात असणाऱ्या कागदपत्रांवरून अनिल फडके यांचा शोध लावला व त्यांच्याशी संपर्क साधून तुमचे पडलेले पॉकीट मला मिळालेले आहे ते ओळख पटवून घेवून जा, असे सांगितले. ऊ त्याप्रमाणे सोपस्कार पूर्ण करून मुळ मालक अनिल फडके यांना ते पॉकेट प्रामाणिकपणे परत केले. पॉकेट परत मिळाल्याने अनिल फडके यांना आनंद खुप मोठा झाला होता. त्याबद्दल त्यांनी महेश पोतदार यांचे आभार मानले व त्यांना त्यांच्या प्रामाणिकपणा बद्दल शाबासकी दिली. आजच्या या धावपळीच्या युगात असे काम करणारी लोकं ही कमीच त्यात अशी माणसे सापडणे म्हणजे दगडात देव शोधण्यासारखे आहे. अशा देव माणसांना मानाचा मुजरा त्यांनी केला आहे.



# नागोठणे ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत राष्ट्रवादीचे राजेश पिंपळे विजयी : शिवसेना उमेदवाराचा पराभव

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठणे ग्रामपंचायतीच्या प्रभाग क्रमांक ५ मधील रिक्त झालेल्या एका जागेसाठी मंगळवार दि. २१ डिसेंबर रोजी पोटनिवडणुक घेण्यात आली. या निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उमेदवार राजेश पिंपळे( ५१३ मते ) यांनी शिवसेनेचे उमेदवार संजय पिंपळे(४६६ मते ) यांचा ४७ मतांनी दारुण पराभव केला. शिवसेना व राष्ट्रवादी कॉंगेसने प्रतेष्ठेची केलेल्या या निवडणुकीत नागोठणेचे माजी सरपंच राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते व राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या पेण विधानसभा मतदार संघाचे उपाध्यक्ष विलास चौलकर हे किंगमेकर ठरल्याचे या निकालावरुन दिसून आले. नागोठण्यातील या पोटनिवडणुकीत १२०८ पैकी ९८८ मतदान झाले होते. यामध्ये ९ मते नोटा होती.



नागोठण्यातील ही पोटनिवडणूक शिवसेनाच जिंकणार अशी चर्चा नागोठण्यात व विभागात असतानांच विलास चौलकर यांनी जादूची कांडी फिरविल्याप्रमाणे ही निवडणूक जिंकून दाखवली व विरोधी शिवसेनेला जबरदस्त धक्का दिला असल्याचे बोलले जात आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसचा उमेदवार निवडून आल्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या तरुण कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड प्रमाणात उत्साह संचारला आहे. दरम्यान राष्ट्रवादीचे नेते बाळासाहेब टके हे नागोठणे शहर अध्यक्ष झाल्यानंतर ही पहिलीच निवडणूक असल्यामुळे बाळासाहेब टके फारच आनंदी झाल्याचे दिसून येत होते.

निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या कार्यकर्ते रोहा तहसीलदार कार्यालयातून नागोठण्यात आल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकातून विजयी रॅलीस प्रारंभ झाला. रॅली बाजारपेठ मार्गे खुमाचा नाका, गांधी चौक मार्गे आल्यानंतर ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिरात रॅलीची सांगता झाली. त्यानंतर मंदिरात आरती झाल्यानंतर खडकआळी येथील श्री स्वामी समर्थ मठामध्ये विजयी उमेदवारासह कार्यकर्त्यांनी दर्शन घेतले. या विजयी मिरवणुकीत राष्ट्रवादीचे नेते भाई टके, विलास चौलकर, हरीषशेठ काळे, लियाकत कडवेकर, चंद्रकांत गायकवाड, विभागीय अध्यक्ष संतोषभाई कोळी, शहार अध्यक्ष बाळासाहेब टके, विनय गोळे, प्रकाश मोरे, सुनील लाड, दिनेश घाग, चंद्रकांत कामथे, विठ्ठल (तात्या) खंडागळे, मधुकर चौलकर, रोहिदास हातनोलकर, अॅड. श्रीकांत रावकर, प्रथमेश काळे, सिध्देश काळे, मंदार चितळे, रविंद्र वाजे, मनोज टके, चेतन टके, अक्षय नागोठणेकर, केतन भोय, कृष्णा राऊत, राजू जोशी, रवी जोशी, नारायण तेलंगे, प्रदीप पवार, विनोद पवार, नितीन राऊत, सचीन ठोबंरे, दिनेश ठोंबरे, आशा शिर्के, रिचा राजेंद्र धात्रक, सुजाता जवके, प्रतिभा तेरडे, सुनिता तटकरे, अर्चना पिंपळे आदींसह राष्ट्रवादीचे असंख्य कार्यकर्ते, खडक आळीतील ग्रामस्थ तसेच महिला बहुसंख्येने सहभागी झाल्या होत्या.

# न्हावा बंदरात समुद्र मार्गाने हल्ला या विषयावर पोलीस व जवान यांचा संयुक्त मॉंक ड्रिल



**दै.रायगड नगरी । उरण**

विविध सुरक्षा एजन्सींमधील समन्वय मजबूत करण्यासाठी आणि नवीन रणनीती शिकण्यासाठी तसेच रिअल टाइम रिस्पॉन्स तपासण्यासाठी, सीआयएसएफ युनिटमध्ये ओएनजीसी मुंबईच्या ओएनजीसी न्हावा बंदरात समुद्र मार्गा ने हल्ला या विषयावर दिनांक २१ डिसेंबर २०२१ रोजी Deputy Commandant श्रीमती निलम काजलांच्या मार्गदर्शनात मल्टी एजन्सीं मॉंक ड्रिल करण्यात आला.

२६/११ रोजी मुंबई शहरावर झालेल्या अतिरेकी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर जागरूकता निर्माण करण्यासाठी न्हावा बंदरात समुद्र मार्गाने हल्ला या विषयावर पोलीस व जवान यांच्या संयुक्त विद्यमाने एकसंघ श्रीमती निलम काजलांच्या मार्गदर्शनाखाली मॉंक ड्रिल करण्यात आला,

ज्यामधे नवी मुंबई पोलीस QRT (Quick reaction team), नवी मुंबई पुलिस सागरी सुरक्षा दल (Costal Security branch), नवी मुंबई BDDS Team, स्थानिक पोलीस स्टेशन, CISF अग्निशमन शाखा, CISF सुरक्षा शाखा, CISF श्वान पथक, ONGC व्यवस्थापन आणि MDL ( माझगाव डॉक यार्ड) चे अधिकारी संमिलीत झाले होते. CISF युनिट RCFL Chembur चे -ssistant Commandant पी एस रावत समीक्षक म्हणून उपस्थित होते.

# स्टोन स्लिंग थ्रो फेडरेशनतर्फे राज्यस्तरीय गोफण प्रशिक्षण शिबिर

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

गोफणफेक फेडरेशनमार्फत रायगड जिल्ह्यातील पोलादपूर तालुक्यात राज्यस्तरीय गोफण प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. राज्यातील कित्येक जिल्ह्यातून गोफण खेळाच्या प्रशिक्षणासाठी खेळाडूंनी हजेरी लावली. एकूण ८० खेळाडूंनी या प्रशिक्षण शिबिरात भाग घेतला आणि यशस्वीरित्या प्रशिक्षण घेतले. या शिबिराचे उद्घाटन आ.भरत गोगावले यांच्याहस्ते करण्यात आले. हे शिबिर तीन दिवसांचे असून पोलादपूर तालुक्यातील राष्ट्रीय गोफणपटू ओंकार उतेकर यांनी या प्रशिक्षण शिबिराचे व्यवस्थापन केले.

गोफणफेक फेडरेशनच्या माध्यमातून ग्रमीण भागातील तरुणांना गोफण या खेळाचे प्रशिक्षण देण्यासाठी फेडरेशन कमिटीने पाहिले राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबिर आयोजित केले. या कार्यक्रमासाठी पोलादपूर तालुक्यातील बोरावळेतील लक्ष्मण मोरे, संजय मोदी, लक्ष्मण साने, नारायण साने, ह.भ.प. पांडुरंग उतेकर, मदन उतेकर, अर्जुन चव्हाण, लक्ष्मण कदम, माजी पोलिस उपनिरीक्षक महादेव उतेकर, सिताराम उतेकर, सुजल दळवी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

स्टोन स्लिंग थ्रो फेडरेशन भारतभर या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करणार असून याची सुरुवात महाराष्ट्र राज्यातील रायगड जिल्ह्यापसून करण्यात आली आहे. फेडरेशन डायरेक्टर आणि राष्ट्रीय खेळाडू अवनीश तापकीर, रागिणी अमराळे, प्रसाद तापकीर या पहिल्या प्रशिक्षण शिबिरासाठी आवर्जून उपस्थित राहिले. धैर्य सामाजिक संस्थेचे सदस्य विवेक कदम, आदित्य कदम, शिक्षकवृंद ज्ञानेश्वर उतेकर, सतीश शिंदे, राहुल बावणे यांनी देखील विद्यार्थ्यांसमवेत गोफण प्रशिक्षणात सहभाग घेतला.



याप्रसंगी आ.भरत गोगावले यांनी फेडरेशनच्या या उपक्रमाचे कौतुक केले आणि गोफण पारंपारिक परंतु नव्याने खेळ स्वरूपात उदयास आलेल्या खेळामध्ये उत्तम खेळाडू घडविण्यासाठी आणि पुढील वाटचालीसाठी फेडरेशन कमिटीला शुभेच्छा दिल्या.

# मा.उपमहापौर विक्रांत पाटील यांचा विकास कामांचा लोकार्पण कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रभाग १८ चे कार्यतत्पर नगरसेवक विक्रांत बाळासाहेब पाटील हे नेहमीच विकासकामे आणि नावीन्यपूर्ण उपक्रम यासाठी कार्यरत असतात. प्रभागातील काही महत्वपूर्ण विकास कामांचा लोकार्पण कार्यक्रम ठाणा नाका रोड येथे पार पडला.



ठाणा नाका रोड वरील काही सोसायट्यांना जाणाऱ्या रस्त्यावर स्ट्रीट लाईट ची संख्या कमी असल्यामुळे या भागात थोडासा अंधार पडत होता आणि यामुळें रहदारीस त्रास होत होता.या परिसरातील सोसायट्यांच्या नागरिकांनी हा विषय कार्यक्षम नगरसेवक विक्रांत पाटील यांच्याकडे मांडला.विक्रांत पाटील यांनी तात्काळ या विषयात लक्ष घालून आपल्या नगरसेवक निधी मधून येथे ५ स्ट्रीट लाईट ची तरतूद करून घेतली आणि त्याचे लोकार्पण करण्यात आले. आपली मागणी लवकरात लवकर पूर्ण करून दिली त्याबद्दल रहिवाशांनी नगर–सेवक विक्रांत पाटील यांचे आभार मानले आणि त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# उड्डाणपुलावर सिमेंटचा बल्कर अडकला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहराजवळून जाणाऱ्या एका उड्डाण पुलावर सिमेंटचा बल्कर अडकल्याने या वाहनाचे नुकसान झाले आहे. तर या अपघातात कोणीही जखमी झाला नाही. शहरातील नानासाहेब धर्माधिकारी उड्डाण पुलावरुन एक सिमेंटचा बल्कर जात असताना वाहन चालकाचा ताबा सुटून तो रस्त्याच्या दुभाजकावर जावून अडकला. यात वाहनाचे नुकसान झाले आहे.

---

श्री.मुजावर सो.कोर्ट

अॅड.शशिकांत काळु म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१९६८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२४/०२/२०२२

श्री.अण्णा बळीराम म्हात्रे
वय : ५५ वर्षे, धंदा : शेती
रा.मु.खुटारी, पो.तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांची पत्नी कै.सुमन अण्णा म्हात्रे ह्या दि.०९/११/२०२१ रोजी मु.ओवे, पो.खारघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाल्या आहेत. तसेच त्यांची आई कै.जनाबाई बाब्या महत्रे ह्या दि.१३/११/२०१५ रोजी मु.ओवे, पो.खारघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाल्या आहेत. कै.सुमन अण्णा म्हात्रे यांच्या आईच्या नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| तळोजा पाचनंद | १२९ | ३०३ | ५ क | ०–११–२ |
| | | ३०३ | ५ ब | ०–०६–१ |

सदरच्या मिळकती ह्या नवीन मुंबई प्रकल्पाकरिता सिडकोने संपादीत केल्या आहेत. सदर मिळकतीचा अॅवॉर्ड हा कै.सुमन अण्णा म्हात्रे यांच्या आई कै.जनाबाई बाकू म्हात्रे या नावाने प्रसिद्ध झालेला आहे. सदर वर नमूद मिळकतीत कै.सुमन अण्णा म्हात्रे त्यांचे पश्चात त्यांचे वारसदार या नात्याने अर्जदार यांचा सामाईक हिस्सा आहे.

तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.सुमन अण्णा म्हात्रे यांचे वारसदार या नात्याने कै.सुमन अण्णा म्हात्रे यांचे हिश्श्याचे सरकारकडून मिळणारे किंवा सिडकोकडून मिळणारे १२.५ टक्के भूखंड तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.दिवाणी न्या.व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीतील कै.सुमन अण्णा म्हात्रे यांचे हिश्श्यात अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.२२/१२/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.सोनावणे सो यांचे कोर्टात

श्रीमती.अमृता मा. जामदार
अर्जदाराचे वकील

## जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१९१८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२८/०१/२०२२

सौ.संध्या मजुमदार
रा.सदनिका क्र.२०२, हरी किरण को.ऑपरेटीव्ह
हौसिंग सोसायटी, प्लॉट क्र.२०८, सेक्टर १०,
नवीन पनवेल, रायगड–४१०२०६ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नामाद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार सौ. संध्या मजुमदार यांचा मुलगा मयत श्री.सोमीथ सुदान्गशु मजुमदार यांचे दि.२१/११/२०२० रोजी पनवेल येथे निधन झाले असून सदर मयताच्या नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

FLAT NO.202 ON SECOND FLOOR, IN THE BUILDING CALLED AS "HARI KIRAN" APARTMENT SITUATED ON PLOT NO.208, SECTOR-10, NEW PANVEL (EAST), RAIGAD-410206, AD-MEASURING 567 SQ.FT. BUILD UP AREA

ज्याअर्थी सदरहू अर्जदार हे मयत श्री.सोमीथ सुदान्गशु मजुमदार यांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्यांनी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य तो हरकत न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास सदरहू मयताचे वरील मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२२/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.मुजावर साहेब कोर्ट

अॅड.पुजा एस. अग्रवाल

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१४७०/२०२१
नि.नं.८
ने.ता.०३/०२/२०२२

श्रीम.शंपा भट्टाचार्य
रा.सी.५०४, सफल पार्क सोसायटी,
प्लॉट नं.३–१२, हावरे मॉलच्या विरुद्ध सेक्टर २५,
नेरुळ (पूर्व), नवी मुंबई–४००७०६ — अर्जदार

विरुद्ध

सौ.साओना भट्टाचार्य
रा.ई–४०४, गोकुळ हेवन, एव्हेन्यू हॉटेलजवळ,
ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदेवाडी पूर्व मुंबई–४००१०१

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. श्री.कन्हैयालाल भट्टाचार्य यांचे निधन दि.०६/०९/२०१८ रोजी चेन्नई येथे झालेला असून शंपा भट्टाचार्य ह्यांनी कै.श्री.कन्हैयालाल भट्टाचार्य यांच्या खालील वर्णनाची मिळकत वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. (फक्त ५०% शेअर)

**मिळकतीचे वर्णन**

**फ्लॅट नं.११०१, ११ वा मजला, गितांजली गार्डन, प्लॉट नं.२२९, सेक्टर १०, कोपरा/खारघर ता.पनवेल, जि.रायगड. क्षेत्रफळ ५६.६६८ चौ.मी. कारपेटच्या सोबत टेरेस–८७ चौ.फूट**

**करारनाम्याचे मुल्यांकन ५५,००,०००/– (रु.पंचावन्न लाख मात्र)**

(सदर सदनिकेत कै.श्री.कन्हैयालाल भट्टाचार्य यांचा फक्त ५०% शेअर आहे.)

वरील मिळकत ही कै.श्री.कन्हैयालाल भट्टाचार्य यांच्या स्वकष्टाची असून श्री.शंपा भट्टाचार्य यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाही तर हे मे.कोर्ट यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.श्री.कन्हैयालाल भट्टाचार्य यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२२/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल हे खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत ही सदर मिळकतीचे मुळ मालक श्री.सिताराम बुधाजी म्हसकर यांच्याकडून कायम स्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर बिनशेती जमीन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पालीदेवद, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. व हिस्सा नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार रु.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| ८/अ/३/अ | ३८० चौ.मी. | ३८.०० | श्री.सिताराम बुधाजी म्हसकर |

**मिळकतीचे वर्णन २**
**मौजे : पालीदेवद, ता.पनवेल, जि.रायगड**

| घर मिळकत नं. | मिळकतीचे वर्णन | मालकाचे नाव |
|---|---|---|
| २७६/११ | १०×७ लोखंडी पत्र्याचे शेड व त्यासमोरील मोकळी जागा | श्री.सिताराम बुधाजी म्हसकर |

वरील वर्णन केलेली बिनशेती जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि.२२/१२/२०२१

**सही/–**
**अॅड.भुषण मोरेश्वर म्हात्रे**
**१४६, पहिला मजला, नगरपालिका कॉम्प्लेक्स, भाजी मार्केट जवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६**
**मो.नं.९८९२२२२२५७**

---

मा.गोडसे सो

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो पनवेल

दि.चौ.अर्ज क्र.१४०४/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१७/०१/२०२२

१) श्रीमती.शकुंतला मदनलाल शर्मा, वय : ४४ वर्षे
धर्म हिंदू, पत्ता : बिमा कॉम्प्लेक्स, रुम नं.५०३३,
कळंबोली नोड, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.दिनेश मदनलाल शर्मा, वय : २६ वर्षे
धर्म हिंदू, पत्ता : बिमा कॉम्प्लेक्स, रुम नं.५०३३,
कळंबोली नोड, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड
३) कु.नीरु मदनलाल शर्मा, वय : २४ वर्षे
धर्म हिंदू, पत्ता : बिमा कॉम्प्लेक्स, रुम नं.५०३३,
कळंबोली नोड, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड
४) अंशु मदनलाल शर्मा उर्फ सौ.अंशु सुमित शर्मा
वय : २५ वर्षे, धर्म हिंदू, पत्ता : रुम नं.२८,
राजपूरा खारकरी तिग्राना (१०), भिवानी, हरियाणा १२७०३१
५) श्रीमती.नारायणी जगदीश शर्मा, वय : ६७ वर्षे
धर्म हिंदू, पत्ता : जतू लुहारी, भिवानी खोरा,
भिवानी, हरियाणा १२७०३१ — सर्व अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

कै.मदनलाल शर्मा यांच्या नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

१) ऑफिस नं.बी–५०३३, ५ वा मजला, प्लॉट नं.११९ के.डब्ल्यू.सी, बिमा ऑफिस प्रिमायसेस को.ऑप.सोसा. लि., कळंबोली नोड, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड, क्षेत्र २१५ स्क्वे.फूट

वरील अर्जदार क्र.१ श्रीमती.शकुंतला मदनलाल शर्मा ही कै.मदनलाल शर्मा यांची पत्नी आहे. अर्जदार क्र.२ श्री.दिनेश मदनलाल शर्मा हा त्यांचा मुलगा आहे. अर्जदार क्र.३ कु.नीरु मदनलाल शर्मा ही त्यांची मुलगी आहे. अर्जदार क्र.४ सौ.अंशु सुमीत शर्मा उर्फ अंशु मदनलाल शर्मा ही विवाहित मुलगी आहे आणि श्रीमती.नारायणी जगदीश शर्मा ही आई आहे.

कै.मदनलाल शर्मा यांचे निधन दि.१३/०२/२०१९ रोजी हरियाणा येथे झाले आहे. कै.मदनलाल शर्मा यांच्या निधनाची नोंद सुइ महानगरपालिका, ता.भिवानी खेरा, भिवानी, हरियाणा येथे रेकॉर्ड सदरी केलेली आहे व सुइ महानगरपालिका, ता.भिवानी खेरा, भिवानी, हरियाणा यांनी त्याप्रमाणे मृत्यूचा दाखला दिलेला आहे. सदर दाखला अर्जासोबत जोडलेला आहे.

वरील उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळविण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल आणि वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२१/१२/२०२१ रोजी सहीने व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## ग्रामपंचायत पोट निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीची सरशी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील दोन ग्रामपंचायतीच्या पोटनिवडणुकीचा निकाल आज जाहीर होवून यामध्ये महाविकास आघाडीचे दोन्ही उमेदवार निवडून आल्याने कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला आहे. तालुक्यातील खानाव व जांभिवली ग्रामपंचायत निवडणुकीचा निकाल आज लागून त्यामध्ये खानाव येथून महाविकास आघाडीच्या अर्चना पांडुरंग दिसले या विजयी झाल्या आहेत. तर जांभिवली येथून मनि गोपाळ कातकरी या विजयी झाल्या आहेत.

## ट्रान्सफार्मरमधून तीन लाख ४० हजार रुपये किंमतीच्या ऑईलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा औद्योगिक वसाहतीमधील चॅम्पियन स्टील इंडिया प्रा.लि. कंपनीच्या आवारात असलेल्या ट्रान्सफार्मरमधून तांब्याच्या वायरिंग कॉईल व ४०० लीटर ट्रान्सफार्मर ऑईल असा मिळून ३ लाख ४० हजार रुपये किंमतीच्या मालाची अज्ञात चोरट्यांनी चोरी केल्याची घटना घडली आहे. मोहन कदम (५३) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार चॅम्पियन स्टील इंडिया प्रा.लि. कंपनीच्या आवारात असलेल्या ट्रान्सफार्मरमधून तांब्याच्या वायरिंग कॉईल व ४०० लीटर ट्रान्सफार्मर ऑईलची चोरी अज्ञात चोरट्यांनी केली आहे.

## गांजा अंमली पदार्थ हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गांजा हा अंमली पदार्थ विक्री करण्याच्या उद्देशाने राहत्या घरामध्ये स्वतःच्या ताब्यात कब्जात बाळगून ठेवणाऱ्या एका इसमास तळोजा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. अक्रम हुसेन अब्दुल जलील खान (३२ रा.पाटीलवाडी, पालेखुर्द) या ठिकाणी त्याच्या ताब्यामध्ये गांजा हा अंमली पदार्थ असून सदर मालाची तो विक्री करण्यासाठी स्वतः जवळ बाळगत असल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी पथक गुन्हे शाखा वपोनि सय्यद यांना मिळताच पोलीस उपनिरीक्षक विजय शिंगे, पो.हवा. संतोष गायकवाड, पो.उपनिरीक्षक अनंत लांब, आदींच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून त्या इसमाकडून ५० हजार ४०० रुपये किंमतीचा २ किलो ८० ग्रॅम वजनाचा गांजा हस्तगत केला आहे. याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# कर्जत रेल्वे स्थानकाबाहेर नो पार्किंग परिसरात वाहन पार्क केल्यास होणार कारवाई

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत रेल्वे स्थानक परिसरात असलेल्या नो पार्किंग झोन मध्ये वाहने पार्किंग ठेवल्या जात आहेत.त्या वाहनांवर आता कर्जत रेल्वे पोलीस आणि आरपीएफ यांच्याकडून कारवाई केली जाणार आहे.



कर्जत रेल्वे स्थानक परिसरात तसेच मुख्य प्रवेशद्वारासमोर बेकायदेशीर पार्किंग करणाऱ्या वाहनधारकांना वेळोवेळी सुचना देऊनही अनेक वाहनधारक रेल्वे प्रवाशांना अडथळा होत असते. नो पार्किंग झोन मध्ये वाहने पार्क करत असल्यामुळे प्रवाशांच्या तक्रारी येत होत्या. त्यामुळे यापुढे कर्जत रेल्वे स्थानक परिसरातील नो पार्किंग झोन मधील वाहनांवर कर्जत रेल्वे आरपीएफ, जिआरपी तसेच कर्जत पोलीस ठाणे हे संयुक्त विद्यमाने कर्जत पोलीस ठाण्यातर्फे ई-चलन आकारले जाणार असुन कर्जत रेल्वे स्थानकाच्या फलाट क्रमांक तीन कडील भिसे-गाव दिशेकडील पादचारी पुलासमोरील सुमारे दहा ते पंधरा दुचाकी वाहनांवर तसेच कर्जत रेल्वे स्थानकाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरील फलाट क्रमांक एकच्या तिकीट बुकिंग समोरील नो पार्किंग झोन मधील वीस ते पंचवीस दुचाकी वाहनांवर ई-चलनाची कारवाई करण्यात आली आहे. या वाहनधारकांसोबत कुठल्याही प्रकारे वादविवाद न घालता नो पार्किंग झोनमधील सर्व वाहनांवर ई-चलानची कारवाई करण्यात येणार आहे. प्रथम ई-चलान हे पाचशे रुपयांचे असणार असुन त्यापुढील प्रत्येक ई-चलान हे पंधराशे रुपये इतके असेल. तरी, सर्व वाहनधारकांना विनंती करण्यात येत आहे की, कर्जत रेल्वे स्थानक परिसरात गाडी पार्किंग करीत असताना आपली गाडी नो पार्किंग झोन मध्ये नाही ना याची खात्री करूनच गाडी पार्किंग करावी. अन्यथा आपल्यावर ई-चलनाची कारवाई होऊ शकते.

## हर्षला योगेश तांबोळी यांना दोन पुरस्कार, दिल्ली येथे पार पडला सोहळा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

डायडम मिसेस इंडिया लेगसी २०२१ या स्पर्धेत नवी मुंबई-पनवेल येथील हर्षला योगेश तांबोळी यांना पीपल चॉईस हा किताब आणि ब्युटी विथ पर्पज हा ताज असे दोन पुरस्कार मिळाले आहेत. याबद्दल त्यांचे विविध स्तरातून अभिनंदन केले जात आहे.



डायडम मिसेस इंडिया ले-गसी ही सौंदर्य स्पर्धा दिल्ली येथे नुकतीच पार पडली. या स्पर्धेत संपूर्ण देशभरातून अनेक महिला सहभागी झाल्या होत्या. यावेळी महाराष्ट्रातून चार महिलांची या स्पर्धेसाठी निवड झाली होती. नवी मुंबई-पनवेल मधून हर्षला योगेश तांबोळी यांची या अंतिम स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. या स्पर्धेचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे महिलांना होणारे मासिक त्रास आणि अडचणी याबद्दल जनजागृती करणे असा होता. हर्षला तांबोळी यांनी यापूर्वी अनेक सामाजिक उपक्रमात सहभाग नोंदवला आहे. तसेच महिलांच्या समस्या जाणून घेतलेल्या आहेत. त्यांना सामाजिक कार्याची आवड आहे. स्वर्गीय नारायण लक्ष्मण तांबोळी या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून हर्षला तांबोळी आणि योगेश तांबोळी अनेक उपक्रम राबवत असतात.

या सौंदर्य स्पर्धेसाठी हर्षला तांबोळी यांना अनेकांचा पाठिंबा मिळाला. डायडम मिसेस इंडिया लेगसी या स्पर्धेत हर्षला तांबोळी याना पीपल चॉइस हा किताब आणि ब्युटी विथ पर्पज असे दोन पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे विविध स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

## शिवसेना अवजड वाहतूक सेना प्रदेश उपसचिव पदी अल्ताफ मंसुरी यांची नियुक्ती

**दै.रायगड नगरी । खोपोली**

राष्ट्रीय मंसुरी समाज कोकण प्रदेश अध्यक्ष अल्ताफ जावेद मंसुरी यांची शिवसेना अवजड वाहतूक सेनेच्या महाराष्ट्र राज्य उपसचिव पदी फेरनिवड करण्यात आली आहे. त्याबाबतचे पत्र गोवंडी, नवी मुंबई येथील कार्यालयात शिवसेना अवजड वाहतूक सेना महाराष्ट्र राज्य अध्यक्ष इंद्रजीत सिंह बल यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी प्रदेश कार्याध्यक्ष संदीप मोरे, प्रदेश सचिव नरेशभाई चाळके, प्रदेश उपसचिव संदेश शिरसठ आदींची उपस्थिती होती.



शिवसेना प्रमुख तथा मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी शिवसेना अवजड वाहतूक सेनेची स्थापना केली असून महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी इंद्रजीत सिंह बल यांची नेमणूक करण्यात आली आहे. दरम्यान, आज अल्ताफ मंसुरी यांची महाराष्ट्र राज्य उपसचिवपदी नियुक्ती करण्यात आली. मंसुरी यांच्याकडे नवी मुंबई, रायगड, कोकण व पश्चिम महाराष्ट्राची जबाबदारी देण्यात आली आहे. निवडीनंतर अवजड वाहतूकदारांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच स्थानिकांना रोजगारासाठी मदत करावी, असा आदेश महाराष्ट्र राज्य अध्यक्ष इंद्रजीत सिंह बल यांनी दिला

## पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या माध्यमातून अल्पसंख्याक हक्क दिन संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अल्पसंख्यांक हक्क दिन अनुषंगाने पनवेल शहर पो-लीस ठाणे हद्दीमध्ये मुसलमान नाका या ठिकाणी मुस्लिम बांधवांचे चर्चासत्राचे आयोजन केले होते.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गुन्हे संजय जोशी व इतर सहकाऱ्यांनी सदर चर्चासत्रामध्ये अल्पसंख्याकांचे घटनात्मक व कायदेशीर अधिकार या बाबत माहिती देऊन मार्गदर्शन केले. तसेच मुस्लिम बांधवाना गुलाब पुष्प देऊन सन्मानित करून शुभेच्छा देण्यात आलेल्या आहेत. सदर वेळी सुमारे ३० ते ४० मुस्लिम बांधव उपस्थित होते.



# दि.बा महोत्सव जासई येथे उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

केळवणे येथील तरुण युवक तेजस पाटील(अभिनेता, दिग्दर्शक) आणि त्यांच्या एकविरा कला संस्थेच्या माध्यमातून पहिल्या दिबा महोत्सव २०२१ चे आयोजन मोठ्या थाटामाटात उरण तालुक्यातील जासई येथे पार पडले. या महोत्सवाला जनतेचा उत्तम प्रतिसाद लाभला.



विमानतळ नामंकरण कृती समीती अध्यक्ष दशरथ पाटील, जे.डी.तांडेल, दिबा साहेबांचे चिरंजीव अभय पाटील, अतुल पाटील, अवि पाटील, बाळा पाटील, सुभाष घरत, भाई पाटील, यशवंत घरत, उपमहापौर जगदीश गायकवाड,उपसभापती पंचायत समीती इगतपुरी विठ्ठल लंगडे, गोपीनाथ म्हात्रे, हायस्कूल प्राचार्य घाग, नूरा शेख, ह.भ.प धावजी पाटील, बहूजन विकास आघाडी अध्यक्ष संतोष घरत, आगरी कोळी संगीत चा बादशहा सोमनाथ कोळी, गायक जितू पाटील यांच्या हस्ते उद्घाटन झाले. तसेच पारंपरिक दिंडी, बैलगाडी, वारकरी संप्रदायाचे रथद्वारे वारकरी, शाळकरी तसेच सहा जिल्ह्यातील भुमीपूत्र व ग्रामस्थ यांनी उत्साहात मिरवणूक काढली होती. जासई येथील महिलांच्या पारंपरिक फेऱ्यांच्या नृत्याने सुरुवात झाली. या महोत्सवात दिबा निबंध स्पर्धा, दिबा गायन स्पर्धा, दिबा चित्रकला स्पर्धा, दिबा वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन केले होते. त्यात ठाणे, रायगड, पालघर, नवी मुंबई, नाशिक, मुंबई येथील अनेक लहान मुलांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेत प्रत्येक स्पर्धा विषय हा लोकनेते दिबा पाटील साहेब होता. तसेच या महोत्सवात भुमीपूत्र विमानतळ करिअर मार्गदर्शन चे आयोजन केले होते. सोबत भुमीपूत्र काव्य संमेलन आयोजित केले होते त्यामध्ये अनेक कवींनी सहभाग घेतला होता. सहा जिल्ह्यातील वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या २५ भुमीपूत्रांना भुमीपूत्र सन्मान २०२१ व १५ भुमीपूत्र व भुमीकन्यांना एकविरा कला संस्था सन्मान २०२१ ने व ८ संघटनांना दिबा सामाजिक सन्मान २०२१ने व २ कलाकारांना दिबा कला सन्मान २०२१ने सन्मानित करण्यात आहे.तेजस पाटील यांनी कार्यक्रमाच्या प्रस्तावना भाषणात महोत्सवाचा उद्देश सांगितला.नवी मुंबई विमातळाला नाव फक्त लोकनेते दि.बा.पाटील साहेबांचेच पाहिजे. विमानतळाशी संबंधित नोकरीत ९०% अधिकार फक्त स्थानिक भुमीपूत्रांचाच आहे. तसेच विमानतळाशी संबंधित नोकरी चे प्रशिक्षण देण्यासाठी उरण पनवेल तालुक्यात तंत्रशिक्षण महाविद्यालय झालाच पाहिजे. आणि महोत्सवात लहान मुलांच्या स्पर्धा घेण्याचे कारण म्हणजे येणाऱ्या पिढी ला लोकनेते दि.बा.पाटील साहेब माहिती झाले पाहिजेत.असे तेजस पाटील यांनी सांगितले. दशरथ पाटील, जे.डी.तांडेल, उपमहापौर जगदीश गायकवाड यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. हा महोत्सव पार पाडण्यासाठी महात्मा फुले चारिटेबल ट्रस्ट, जिजामाता चारिटेबल ट्रस्ट, ग्रामपंचायत जासई, छत्रपती शिवाजी महाराज हायस्कूल जासई, रा.जि.प.शाळा जासई, क्रांती महिला मंडळ, सावित्रीबाई महिला मंडळ व ग्रामस्थ मंडळ जासई यांनी मोलाचे सहकार्य केले. आभार प्रदर्शन भाई सुभाष घरत यांनी केले.

## कळंबोलीत अज्ञात वाहनाच्या धडकेत स्कुटी चालक ठार तर त्याचा सहकारी जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मुंब्राकडून पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या अज्ञात वाहनाने पुढे जाणाऱ्या स्कुटीला धडक दिल्याने झालेल्या अप-घातात स्कुटी चालक जागीच ठार तर त्याचा सहकारी गंभीर जखमी झाल्याची घटना सोमवारी रात्री कळंबोली येथे घडली. कळंबोली पोलिसांनी या अप-घाताला जबाबदार असलेल्या अज्ञात वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

या अपघातात ठार झालेल्या स्कुटी चालकाचे नाव गिरधारी सिंग (३०) असे असून तो कळंबोली सेक्टर-१ई मध्ये लहान भावासह रहाण्यास होता. तसेच गिरधारी व त्याचा लहान भाऊ कामेश्वर सिंग हे दोघे कळंबोलीतील तानसा बारच्या बाजूला असलेल्या किरण ऑटोमोबाईल या गॅरेजमध्ये दुचाकी मॅकेनिकचे काम करत होते. सोमवारी रात्री दोघा भावांनी ८ वाजेपर्यंत गॅरेजमध्ये काम केल्यानंतर गिरधारी याने कामेश्वर याला घरी जाण्यास सांगून तो मित्र रवीकुमार सिंग याच्यासोबत जेवण आणण्यासाठी स्कुटी घेऊन गेला. गिरीधर काही अंतर पुढे गेला असतानाच मुंब्रा येथून पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांच्या स्कुटीला जोरदार धडक दिली.

यात गिरधारी याच्या डोक्यावर सदर वाहनाचे चाक गेल्याने तो गंभीर जखमी होऊन जागीच ठार झाला. तर त्याच्यासोबत असलेला रवीकुमार हा गंभीर जखमी झाला. त्यामुळे त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या अपघातानंतर कळंबोली पोलिसांनी अज्ञात वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

## ऐतिहासिक किल्ले बिरवाडीवर सह्याद्री प्रतिष्ठानची दुर्गसंवर्धन मोहीम



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील सरसगड , सुधागड किल्ल्यावर सातत्याने सह्याद्री प्रतिष्ठान च्या माध्यमातून दुर्गसंवर्धन व स्वछता मोहीम राबविली जाते. तरुणांनी असाच प्रेरणादायी उपक्रम हाती घेत डोंगररांगेत असलेला ऐतिहासिक महत्वाच्या बिरवाडी किल्ल्यावर सह्याद्री प्रतिष्ठान मुरुड विभागातर्फे नुकतीच दुर्गसंवर्धन मोहीम राबविली. यावेळी अनेक वास्तूंचे संवर्धन व स्वच्छता करण्यात आली.

या मोहिमेत गडावरील जोते आणि सदरेच्या दगडांचा ढिग मोकळा करण्यात आला. या विस्कळीत भिंतीचे दगड मुळ बांधणीला न हलवता व्यवस्थित बसविण्यात आले. तसेच किल्ल्यावरील बुरुज, पायऱ्या व इतर ठिकाणचे वाढलेले गवत काढण्यात आले. पाण्याची टाकी, गडावरील वास्तू व मंदिर परिसरातील स्वच्छता केली गेली. या मोहिमेत, ऋतिक भोसले, वेदांत भोसले, रोहित चोरघे,आश्विन विरकुड व आविष्कार शिवणकर आदी सभासद सहभागी झाले होते. भविष्यात या किल्ल्याच्या संवर्धनासाठी स्थानिक ग्रामस्थ यांच्यासोबत चर्चा केली जाईल. व लवकरच पुढील संवर्धन मोहिमेचे आयोजन करण्यात येईल. असे ऋतिक भोसले, पदाधिकारी, सहयाद्री प्रतिष्ठान, यांनी सांगितले. जंजिऱ्याच्या सिद्दीला शह देऊन हा किल्ला शिवरायांनी इ.स.१६५८ मध्ये हा किल्ला स्वराज्यात सामील केला. मराठे व सिद्दी अश्या राजवटी या किल्ल्यावर होऊन गेल्या. किल्ल्याचे बांधकाम सुस्थितीत असून पिण्याच्या पाण्याची भरपूर सोय या गडावर आहे. हा किल्ला केंद्र शासनाच्या अंतर्गत असून गडावर संवर्धन कामे वेगाने होणे अपेक्षित आहे.

## मुरुड तालुक्यातील पोट निवडणुकीत शेकाप व शिवसेनेचे सदस्य विजयी

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील मजगाव व उसरोली ग्रामपंचायत मध्ये प्रत्येकी एक एक सदस्य निवडून आणण्याकरिता निवडणूक संपन्न झाली.यामध्ये उसरोली ग्रामपंचायत मध्ये शेतकरी कामगार पक्षाच्या सुनीता संतोष मांदाडकर या मोठ्या मताधिक्याने जिंकून आलेल्या आहेत.त्यांच्या समोर शिवसेनेचा सदस्य उभा होता परंतु लोकांनी शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवारावर विश्वास व्यक्त केला आहे.

तर मजगाव ग्रामपंचायत मध्ये शिवसेनेचे अभिनय कोळी यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जना वाघमारे यांच्यात लढत झाली.यामध्ये शिव-सेनेचे अभिनय कोळी याना ४५६ मते मिळाली तर जना वाघमारे याना २८८ मते मिळाली.कोळी हे १६८ एवढ्या मताधिक्याने विजयी झाल्याने मजगाव मध्ये शिवसेनेने आपला गढ कायम राखला आहे.

मुरुड तालुक्यात आठ ग्रामपंचायती मध्ये पोट निवडणूक संपन्न झाल्या आहेत. यामध्ये सावली,चोरढे व राजपुरी या ग्रामपंचायत मध्ये कोणताही अर्ज दाखल न झाल्यामुळे येथे निवडणूक होऊ शकलेली नाही.

तर एकदरा, कोर्लई व मजगाव या ग्रामपंचायती मध्ये एक एक सदस्य बिनविरोध निवडून आलेले आहेत.कोर्लई मध्ये जना क्रुष्णा वाघमारे एकदरा मध्ये मंगल झुजे,वावडुंगी ग्रामपंचायत मध्ये गोविंद अदावडे हे बिनविरोध निवडून आले आहेत.

मजगाव ग्रामपंचायती मध्ये प्रभाग दोन मधून वर्षा योगेंद्र गोयजी या सुद्धा बिनविरोध निवडून आले असल्याची माहिती मुरुड तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार रवींद्र सानप यांनी दिली आहे. सद-रील निवडणूक संपन्न होण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून दिनेश वारगे व केतन भगत यांनी काम पहिले आहे.

# बोर्ली उपसरपंचपदी नंदकिशोर भाटकर

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील प्रतिष्ठित अशा बोर्लीपंचतन ग्रुप ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी शिवसेनेचे सदस्य नंदकिशोर भाटकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

बोर्ली ग्रामपंचायत उपसरपंच पदाचा कार्यकाळ संपल्याने उपसरपंचपदासाठी सरपंच ज्योती परकर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभा घेण्यात आली. त्यावेळी निर्धारित वेळेत निवडणूक पीठासीन अधिकारी, सरपंच यांच्याकडे नंदकिशोर भाटकर यांचा एकमेव नामांकन अर्ज दाखल झाला.

त्यामुळे पीठासीन अधिका-यांनी ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी भाटकर यांची निवड झाल्याचे जाहीर केले. या विशेष सभेला ग्रामपंचायत सदस्य संतोष पयेर, मन्सूर गिरे, प्रकाश तोंडलेकर, समिधा तोडणकर, भूमी कांबळे, प्रिया पाटील, प्रियांका मुरकर, नुझहत जहांगीरदार, शमीम फकीर आदी उपस्थित होते. निवडणूक कामी ग्रामविकास अधिकारी अनंत सुळ यांनी सहकार्य केले.

उपसरपंचपदी निवड झाल्यानंतर त्यांचे शिवसेना उपतालुकप्रमुख सुकुमार तोंडलेकर, पंचायत समिती सदस्या मीना गाणेकर, राष्ट्रवादी संघटक नंदु पाटील, विभागप्रमुख रमेश कांबळे, चिचंबादेवी देवस्थान अध्यक्ष सुजित पाटील, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष संतोष गायकर, माजी सरपंच निवास गाणेकर, आगरी समाज अध्यक्ष चंद्रकांत धनावडे, भंडारी समाज सचिव शंकर मयेकर, शेतकरी कामगार पक्षाचे लीलाधर खोत, अन्सार चोगले, शरद भाटकर, मनसे तालुकाध्यक्ष सुशांत पाटील, सचिव सुमित सावंत, मिलिंद तोडणकर, सूर्यकांत तोडणकर, मनोहर परकर या ग्रामस्थांनी अभिनंदन केले.